# GCC-TBC

## परीक्षा ऑगस्ट २०१७

## मदतकक्ष

## (संस्थाचालक व परीक्षार्थींसाठी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक १८ ते २४ ऑगस्ट २०१७ या कालावधीत इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. आणि दिनांक २८ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०१७ या कालावधीत मराठी / हिंदी ३० व ४० श.प्र.मि. शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा होत आहे.

या परीक्षेचे उमेदवार व संस्थाचालक यांच्या मदतीसाठी परीक्षा परिषदेमार्फत मदतकक्ष सुरु करण्यात येत आहे. मदतकक्षाची वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अशी राहील.

संपर्क क्रमांक :- ०२०/२५६५४८३३

**ई-मेल आयडी - mscegcctbc@gmail.com**

सूचना :-

१. उमेदवारांनी प्रथमतः संबंधित टंकलेखन संस्थांशी संपर्क साधावा. टंकलेखन संस्थेकडून समस्येचे निराकरण न झाल्यास उपरोक्त क्रमांकावर संपर्क साधावा.

२. बॅच बदल केवळ पुढील बाबतीतच मान्य केला जाईल. याबाबत अंतिम अधिकार परीक्षा परिषदेस असतील.

i)विद्यापीठ परीक्षा ii)स्पर्धा परीक्षा iii)परीक्षा केंद्रावरील तांत्रिक कारण iv)आकस्मिक दुर्घटना इत्यादी याबाबतची मागणी ई-मेलव्दारे आवश्यक पुराव्यासह करता येईल. बदल मान्य झाल्यास संबंधित परीक्षा केंद्रसंचालक/केंद्रसमन्वयक आणि संबंधित उमेदवारांना ई-मेलव्दारे कळविले जाईल. ज्या ई- मेलव्दारे बॅच बदलाचा प्रस्ताव परिषदेस प्राप्त होईल. त्याच ई-मेल आयडीवर बॅच बदल मान्य/अमान्यबाबत कळविले जाईल.

३. केंद्रसंचालक/केंद्रसमन्वयक यांच्यासाठी स्वतंत्र मदतकक्ष कार्यरत राहील. त्याची माहिती केंद्रसंचालक माहिती पुस्तिकेत स्वतंत्रपणे देण्यात आली आहे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१**